**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**
**अपील क्रमांक : ४६४/२०२१**

**अपिलार्थी, श्री. सदानंद एस. गणवीर**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, ब्रम्हपुरी, ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग, नागभिड ता. नागभिड जि. चंद्रपूर.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०९.०१.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | **:** | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | **:** | **उपस्थित** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **:** | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २०.१०.२०२० | निरंक | २१.११.२०२० | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २०.१०.२०२० रोजी** माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "माहे १ एप्रिल २०२० पासून ते ३० सप्टेंबर २०२० पावेतो, १) उपरोक्त कालावधीतील व उपरोक्त कालावधीच्या पुर्वीच्या सुरु असलेल्या कामांची वर्क ऑर्डरची छायाप्रत तसेच उपरोक्त कालावधीतील व उपरोक्त कालावधीच्या पुर्वीच्या सुरु असलेल्या कामांचे बोर्डाचे (नाम फलक बोर्डाचे) छायाप्रत उपलब्ध करुन देण्याबाबत २) उपरोक्त कालावधीतील व उपरोक्त कालावधीच्या पुर्वीच्या सुरु असलेल्या कामांना देण्यात आलेल्या देयकाची माहिती देण्याबाबत.(देयकाच्या ज्या पानावर रक्कम नमुद असते त्या पानाची छायाप्रत केवळ शेवटच्या पानाची छायाप्रत उदा. 1st बिल, 2nd बिल व final बिलच्या छायाप्रत). ३) उपरोक्त कालावधीतील व उपरोक्त कालावधीच्या पुर्वीच्या सुरु असलेल्या कामांना देण्यात आलेले देयके कोणकोणत्या हेडखाली वितरीत करण्यात आली. त्याची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत. ४) उपरोक्त कालावधीतील शासनाच्या योजनेनुसार सुरु असलेल्या प्रत्येक रस्ते कामांच्या नावासह व प्राकलीत रकमेसह माहिती देण्यात यावी तसेच उपरोक्त कालावधीतील झालेल्या प्रत्येक बांधकामाचे फोटो कॉपी देण्याबाबत. ५)

आपल्या उपविभागाअंतर्गत उपरोक्त कालावधीच्या दरम्यान कालावधीचे सर्व मोजमाप पुस्तिका निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्याबाबत. वरील संपूर्ण माहिती साक्षांकित छायाप्रतीत उपलब्ध करुन देण्याबाबत" याबाबतची माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक २१.११.२०२० रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती जाणीवपूर्वक पुरविण्यात आलेली नाही व आजपर्यंत काहीच न कळविल्याने मागणी करण्यात आलेली माहिती अप्राप्त असल्याने" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, यांनी सुनावणी घेवून आदेश पारीत करण्यात आलेला नाही.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०८.०२.२०२१ रोजी** "कोणताही आदेश प्राप्त नाही" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक ०९.०१.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता श्री. ए.एच. चहांदे उपस्थित आहेत तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता श्री. ए.जे. रामटेके उपस्थित आहेत.

अपीलार्थी श्री. गणवीर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दिनांक ०८.०२.२०२१ रोजी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जावर आज झालेल्या सुनावणी दरम्यान सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन व उपस्थितांचे युक्तिवाद विचारात घेता, अपीलार्थी श्री. गणवीर यांनी व्यक्तिश: हजर राहून दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, सदर अर्जाची माहिती प्राप्त झाली असून सदर माहितीचे अवलोकन केले असता माझे समाधान झाले आहे. त्यामुळे यापुढे संबंधीत विभागाकडून कोणतीही तक्रार राहीली नाही, असे स्वाक्षरीनिशी नमुद केले आहे. ही बाब लक्षात प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर (seal)

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०९.०१.२०२३**

जावक क्रमांक 4968 दिनांक 4 SEP 2023